सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले.

# कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती शुक्रवारी उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, कैलास सोनावणे, अधिसभा सदस्य अॅड. अभिषेक मिठारी, सरलाताई पाटील, भूगोल अधिविभागाचे डॉ. एस.के. पवार, सचिन पन्हाळकर, जे. बी. सपकाळे, पी. टी. पाटील, मीना पोतदार, अभिजित पाटील, सुनील जाधव आदी उपस्थित होते.

पुढारी




कोल्हापूर : कर्मवीर पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी अभिवादन केले.

# विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते कर्मवीर पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कर्मवीर पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. कैलास सोनावणे, सरला पाटील, डॉ. एस. के. पवार, डॉ. सचिन पन्हाळकर आदी उपस्थित होते.

लोकमत



शरण साहित्य अध्यासनासाठी एक लाख रुपयांचा निधी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सरलाताई पाटील यांनी सुपूर्द केला. अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, राजशेखर तंबाके आदि उपस्थित होते.

# यड्रावकर यांच्याकडून शरण अध्यासनास एक लाख रुपये

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू होणाऱ्या शरण साहित्य अध्यासनासाठी आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर यांनी एक लाख रुपयांचा प्रथम निधी शुक्रवारी प्रदान केला. विद्यापीठात २५ मार्चला अधिसभेमध्ये विद्यापीठात शरण साहित्य अध्यासन स्थापन करण्याचा ठराव एकमताने मंजूर केला आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सरलाताई पाटील यांनी धनादेश सुपूर्द केला. यावेळी ॲड. अभिषेक मिठारी, राजशेखर तंबाके, विलास आंबोळे, सी. व्ही. चौगुले, यश आंबोळे, दत्ता घुटुकडे उपस्थित होते.

सकाळ



**कोल्हापूर :** कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सरलाताई पाटील यांच्या हस्ते निधी सुपूर्द करण्यात आला. या वेळी अभिषेक मिठारी, राजशेखर तंबाके, विलास आंबोळे, सी. व्ही. चौगुले, यश आंबोळे, दत्ता घुटुकडे आदी.

# शरण साहित्य अध्यासनासाठी लाखाचा निधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सुरू होणाऱ्या शरण साहित्य अध्यासनासाठी आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर यांनी एक लाख रुपयांचा निधी प्रदान केला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे शुक्रवारी सरलाताई पाटील यांच्या हस्ते निधी सुपूर्द करण्यात आला. यावेळी अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, राजशेखर तंबाके, विलास आंबोळे, सी. व्ही. चौगुले, यश आंबोळे, दत्ता घुटुकडे आदी उपस्थित होते. २५ मार्च रोजी झालेल्या अधिसभेमध्ये विद्यापीठात शरण साहित्य अध्यासन स्थापन करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. या अध्यासनासाठी लोकवर्गणी जमा करण्याचे आवाहन कोल्हापूर लिंगायत समाज संस्थेने केले होते. संस्थेच्या या आवाहनाला तत्परतेने प्रतिसाद देत आमदार राजेंद्र पाटील- यड्रावकर यांच्याकडून १ लाख रुपयांचा प्रथम निधी देणगी स्वरूपात देण्यात आला. यापूर्वी एप्रिल २०२३ मध्ये शरण साहित्य अध्यासनासाठी कोल्हापूर बसव केंद्रातर्फे विद्यापीठास ११ हजार रुपयांची शरण साहित्य ग्रंथसंपदा भेट देण्यात आली आहे.

लोकमत

# सहकारी बँकिंगसमोरील समस्या कमी होतील

## डॉ. उदय जोशी : विद्यापीठात विशेष व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सहकार क्षेत्राने गेल्या काही वर्षांत अनेक चढ-उतार अनुभवले असले तरी नजीकच्या कालखंडात



सहकारी बँकिंग क्षेत्रासमोरील समस्या कमी होतील, असा आशावाद नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स अँड क्रेडिट सोसायटीज् लिमिटेड तथा 'नॅफकब'चे संचालक डॉ. उदय जोशी यांनी गुरुवारी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र यांच्यातर्फे स्व. लक्ष्मणराव इनामदार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'सहकारी बँकांची भविष्यातील वाटचाल' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते.

कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक फेडरेशनच्या उपाध्यक्षा वैशाली आवाडे प्रमुख उपस्थित होत्या.

डॉ. उदय जोशी म्हणाले, देशात बँकांच्या वाढीला मोठी संधी आहे. सहकारी बँकांचे देशातील प्रमाण अवघे ३ टक्के आहे. आणि त्यांचे कार्यक्षेत्र फार मोठे आहे. त्यामुळे त्यांनाही वाढीची मोठी संधी आहे. मात्र, त्यांची सेंद्रिय वाढ झालेली नाही. आज सहकारी बँकिंगसाठी पोषक परिस्थिती निर्माण होताना दिसते. नजीकच्या काळात आणखी चांगले बदल दिसतील आणि या क्षेत्रासमोरील समस्या कमी होतील. बदलांचा सकारात्मक परिणाम दिसेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, सहकारी बँकांनी आधुनिकतेची कास धरीत डिजिटल सुविधा उपलब्धतेच्या दिशेने जायला हवे. रिझर्व्ह बँकेच्या यासंदर्भातील धोरणांचाही संशोधनात्मक अभ्यास गरजेचा असून या विषयाच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर सातत्यपूर्ण चर्चा होणे लाभदायी ठरेल. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. राजन पडवळ यांनी आभार मानले.

पुढारी

# स्कूल ऑफ नॅनोसायन्सचे १५ विद्यार्थी पीएच.डी.सह उच्च शिक्षणासाठी परदेशी

## आजपर्यंत ९० विद्यार्थी परदेशी; विभागाची उत्कृष्ट कामगिरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीचे १५ विद्यार्थी-विद्यार्थिनी पीएच.डी.सह विविध अभ्यासक्रमांच्या उच्च शिक्षणासाठी परदेशातील शैक्षणिक संस्थांकडे रवाना झाले आहेत. दशकभराच्या वाटचालीमध्ये विभागाने यश प्राप्त केले आहे.

विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातील अनेक विद्यार्थी दरवर्षी भरघोस फेलोशिपसह पीएच.डी. व आधुनिक विषयांच्या अभ्यासासाठी परदेशात जातात.


शिवाजी विद्यापीठातून

२०१२-१३ मध्ये सुरू झालेल्या नव्या अधिविभागातून आजपर्यंत ५७ पेक्षा अधिक विद्यार्थी पीएच.डी.च्या संशोधनासाठी, तर दहापेक्षा अधिक विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणासाठी व पाच विद्यार्थी पोस्ट डॉक्टरेट रिसर्च स्टडीजसाठी परदेशातील विद्यापीठांमध्ये गेले आहेत.

यावर्षीदेखील स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजीचे ११ विद्यार्थी पीएच.डी.साठी, दोन विद्यार्थी पोस्ट-डॉक्टरेट रिसर्चसाठी, तर दोन विद्यार्थी पदव्युत्तर पदवीसाठी ऑस्ट्रेलिया, जर्मनी, झेक रिपब्लिक, इंग्लंड तसेच दक्षिण कोरिया या देशांमधील नामांकित विद्यापीठांकडे रवाना झाले आहेत. विद्यार्थ्यांना स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांच्यासह प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

23 SEP 2023

जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्कूल ऑफ नॅनो सायन्सचे पंधरा विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशी

## दहा वर्षांत ९० विद्यार्थ्यांचे परदेशात शिक्षण; विभागाची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँण्ड बायोटेक्नॉलॉजीचे १५ विद्यार्थी-विद्यार्थिनी पीएच.डी.सह विविध अभ्यासक्रमांच्या उच्चशिक्षणासाठी परदेशातील शैक्षणिक संस्थांकडे रवाना झाले.

विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँण्ड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागातील अनेक विद्यार्थी दरवर्षी भरघोस फेलोशिपसह पीएच.डी. तसेच आधुनिक विषयांच्या अभ्यासासाठी परदेशात जातात. २०१२-१३ मध्ये सुरू झालेल्या या नव्या अधिविभागातून आजपर्यंत ५७ पेक्षा अधिक विद्यार्थी पीएच.डी.च्या संशोधनासाठी, दहापेक्षा अधिक विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणासाठी आणि पाच विद्यार्थी पोस्ट डॉक्टरेट रिसर्च स्टडीजसाठी परदेशातल्या नामांकित विद्यापीठांमध्ये गेले आहेत. यंदाही स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँण्ड बायोटेक्नॉलॉजीचे ११ विद्यार्थी पीएच.डी. साठी, दोन विद्यार्थी पोस्ट-डॉक्टरेट रिसर्चसाठी, तर दोन विद्यार्थी पदव्युत्तर पदवीसाठी ऑस्ट्रेलिया, जर्मनी, झेक रिपब्लिक, इंग्लंड तसेच दक्षिण कोरिया या देशांमधील विद्यापीठांकडे रवाना झाले.

**परदेशात गेलेले विद्यार्थी**

पीएच.डी.: प्रज्ञा पाटील, अभिषेक कुलकर्णी (ऑस्ट्रेलिया), भक्ती जाधव, अंकिता निकम, आदर्श पाटील, आशिष कणसे, रोहन हगवणे, अभिषेक चव्हाण, योगेश डांगे, ओंकार पाटील, (दक्षिण कोरिया), अपूर्वा वडणगेकर (झेक रिपब्लिक). पोस्ट डॉक्टरल रिसर्च: डॉ. सोमनाथ कुंडले, डॉ. स्नेहल पाटील (दक्षिण कोरिया). पदव्युत्तर पदवी : वैभवी जाधव (जर्मनी), विनायक निर्मळे (इंग्लंड).

सकाळ

# 'नॅनोसायन्स'चे १५ विद्यार्थी उच्चशिक्षणासाठी परदेशी

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीचे १५ विद्यार्थी-विद्यार्थिनी पीएच.डी.सह विविध अभ्यासक्रमांच्या उच्चशिक्षणासाठी परदेशातील शैक्षणिक संस्थांकडे रवाना झाले आहेत. अवघ्या दशकभराच्या वाटचालीमध्ये विभागाने हे यश मिळविले आहे.

विद्यापीठात सन २०१२-१३ मध्ये सुरू झालेल्या या नव्या अधिविभागातून आजपर्यंत ५७ पेक्षा अधिक विद्यार्थी पीएच.डी.च्या संशोधनासाठी, तर दहापेक्षा अधिक विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणासाठी आणि पाच विद्यार्थी पोस्ट डॉक्टरेट रिसर्च स्टडीजसाठी परदेशातल्या नामांकित आणि प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था आणि विद्यापीठांमध्ये गेले आहेत. यंदाच्या वर्षदिखील 'स्कूल ऑफ नॅनोसायन्स'चे ११ विद्यार्थी पीएच.डी., दोन विद्यार्थी पोस्ट-डॉक्टरेट रिसर्च, तर दोन विद्यार्थी पदव्युत्तर पदवीसाठी ऑस्ट्रेलिया, जर्मनी, झेक रिपब्लिक, इंग्लंड तसेच दक्षिण कोरिया या देशांमधील नामांकित विद्यापीठांकडे रवाना झाले आहेत.

त्यात पीएच.डी.चे विद्यार्थी प्रज्ञा पाटील, अभिषेक कुलकर्णी (ऑस्ट्रेलिया), भक्ती जाधव, अंकिता निकम, आदर्श पाटील, आशिष कणसे, रोहन हगवणे, अभिषेक चव्हाण, योगेश डांगे, ओंकार पाटील (दक्षिण कोरिया), अपूर्वा वडणगेकर (झेक रिपब्लिक), पोस्ट डॉक्टरल रिसर्चसाठीचे विद्यार्थी डॉ. सोमनाथ कुंडले, स्नेहल पाटील (दक्षिण कोरिया) आणि पदव्युत्तर पदवीसाठीचे विद्यार्थी वैभवी जाधव (जर्मनी), विनायक निर्मळे (इंग्लंड) यांचा समावेश आहे. त्यांना 'स्कूल ऑफ नॅनोसायन्स'चे संचालक डॉ. किरण कुमार शर्मा यांच्यासह प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत

# विद्यापीठाच्या नॅनोसायन्सचे १५ विद्यार्थी परदेशी रवाना

प्रतिनिधी
कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजीचे १५ विद्यार्थी, विद्यार्थिनी पीएच.डीसह विविध अभ्यासक्रमांच्या उच्चशिक्षणासाठी परदेशातील शैक्षणिक संस्थांकडे रवाना झाले आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागातील अनेक विद्यार्थी दरवर्षी भरघोस फेलोशीपसह पीएच.डी. तसेच आधुनिक विषयांच्या अभ्यासासाठी परदेशात जातात.

या अधिविभागातून आजपर्यंत ५७ पेक्षा अधिक विद्यार्थी पीएच.डी. संशोधन, तर दहापेक्षा अधिक विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षण व पाच विद्यार्थी पोस्ट डॉक्टरेट रिसर्च स्टडीजसाठी परदेशात गेले आहेत. यावर्षी ११ विद्यार्थी पीएच.डी., दोन विद्यार्थी पोस्ट–डॉक्टरेट रिसर्च व दोन विद्यार्थी पदव्युत्तर पदवीसाठी ऑस्ट्रेलिया, जर्मनी, झेक रिपब्लिक, इंग्लंड व दक्षिण कोरिया या देशातील विद्यापीठांकडे रवाना झाले आहेत.

## परदेशात गेलेले विद्यार्थी, कंसात देश

पीएच.डी.: प्रज्ञा पाटील, अभिषेक कुलकर्णी (ऑस्ट्रेलिया), भक्ती जाधव, अंकिता निकम, आदर्श पाटील, आशिष कणसे, रोहन हगवणे, अभिषेक चव्हाण, योगेश डांगे, ओंकार पाटील, (दक्षिण कोरिया), अपूर्वा वडणगेकर (झेक रिपब्लिक). पोस्ट डॉक्टरल रिसर्च: डॉ. सोमनाथ कुंडले, डॉ. स्नेहल पाटील (दक्षिण कोरिया). पदव्युत्तर पदवी: वैभवी जाधव (जर्मनी), विनायक निर्मळे (इंग्लंड).